*विदर्भ व मराठवाडयातील 19 जिल्हयांमध्ये कुक्कट विकासाचे निर्धारित उपक्रम राबविण्याचा मंत्रीमंडळाचा निर्णय*

*अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी घोषीत केलेल्या पॅकेजमधील घोषणेची पूर्तता*

*परसातील कुक्कुट पालनाला मिळणार चालना*

विदर्भ व मराठवाडा विभागातील 19 जिल्हयांमध्ये प्रती जिल्हा शंभर बचतगटांतील एकूण एक हजार लाभार्थ्यांना अंडयांवरील कोंबडयांचे गट वाटप करणे, विदर्भ व मराठवाडयातील 19 जिल्हयांपैकी वाशीम यवतमाळ, हिंगोली, अमरावती, नागपूर, वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली व गोंदिया या 10 जिल्हयांमध्ये प्रती जिल्हा एक हजार लाभार्थ्यांना अंडयांवरील पक्ष्याकरिता संरक्षक निवा-यासाठी 50 टक्के अनुदान देण्याचा तसेच मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र नागपूर या संस्थेची पक्षी संगोपनाची सद्यःस्थितीतील क्षमता 2000 पक्ष्यांनी वाढविण्यासाठी नविन पक्षी शेडचे बांधकाम, नविन हॅचर व सेंटरची उभारणी तसेच जैव सुरक्षेच्या दृष्टीने 1 कि.मी. लांबीची 8 फुट उंचीची भिंत उभारण्याचा निर्णय राज्य मंत्रीमंडळाने आज झालेल्या बैठकीत घेतला. अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिनांक 20 जुलै 2018 रोजी विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्राच्या जलद विकासासाठी राबवायाच्या उपाययोजनांचा विशेष कार्यक्रम विधीमंडळात जाहीर केला होता. त्यात जाहीर केल्याप्रमाणे मंत्रीमंडळाने आज हा निर्णय घेतला आहे.

ग्रामीण भागातील महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देणे, परसातील कुक्कुट पालनास चालना देवून देशी अंडी उत्पादनास प्रोत्साहन देणे, स्वयंसहाय्यता बचत गटास बळ देणे व महिलांना अर्थाजनाचा स्त्रोत पुरविणे, आर्थिकदृष्टया महिलांना सक्षम बनविणे, ग्रामीण तसेच शहरी भागात अंडी व मासांची उपलब्धता वाढविणे, अंडी व मासांच्या उपलब्धीद्वारे संतुलित आहार उपलब्ध होवून कुटूंबाचे पोषण चांगल्या प्रमारे साध्य करणे ही या योजनेची उद्दिष्टे आहेत.

मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र, नागपूर या संस्थेचे बळकटीकरण करणे अंतर्गत नवनी पक्ष्यांसाठी नवीन शेडचे बांधकाम केल्यास प्रक्षेत्रावर सद्यस्थितीच्या क्षमतेपेक्षा 2000 अधिकच्या पक्ष्यांचे संगोपन करण्यात येईल. तसेच प्रक्षेत्रावर नवीन सिटर व हॅचर यंत्र खरेदी केल्याने, प्रकल्पाची एक दिवसीय अंडी उत्पादन क्षमता वाढल्याने शेतक-यांना मागणीनुसार एक दिवसीय पिल्लांना सतत पुरवठा करता येणे शक्य होईल तसेच विविध शासकीय योजनेअंतर्गत एक दिवसीय पिले, 4 आठवडयाचे व 16 आठवडयाच्या पक्ष्यांना पुरवठा सातत्याने करणे सोयीचे होईल. कुक्कुट प्रकल्पाच्या दृष्टीने 1 किमी लांबीची व 8 फुट उंचीची भिंत बांधणे आवश्यक आहे तसेच सदरची बाब जैवसुरक्षेच्या दृष्टीने देखील आवश्यक आहे. विदर्भ व मराठवाडा विभागातील सातत्याने कमी होणार पर्जन्यमान, त्याची अनियमितता यामुळे शेती उत्पादन कमी होत असल्यमामुळे आत्महत्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी या विभागातील शेतक-यांना शेतीपूरक व्यवसाय म्हणून परसातील कुक्कुट पालन हा अत्यंत उपयुक्त पर्याय असल्याने शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण कमी होण्यास निश्चीत मदत होणार आहे.